शासकीय जमिनीमधून गॅस कंपनीच्या पाईपलाईन टाकण्याची परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : जमीन ०१/२००७/प्र.क्र.८/ज-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :०६ सप्टेंबर, २००८

**वाचा :-** शासन पत्र समक्रमांक दि.४.६.२००७.

**शासन निर्णय :-**

शासकीय जमिनीमधून गॅस कंपनीच्या पाईपलाईन टाकण्याची परवानगी देण्याबाबतच्या अंतरिम सूचना सर्व विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांना शासनाच्या दि.४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शासकीय जमिनींचा राईट ऑफ युज संपादित करण्यासंदर्भात सर्व अटी व धोरण / भाडेपट्टा तसेच अशा जमिनीतून पाईपलाईन टाकण्याच्या दिनांकापासून (१ जानेवारीच्या प्राईम लेंडिंग रेटनुसार) थकित भुईभाड्याच्या रकमेवर नियमानुसार व्याज भरण्याच्या हमीपत्राच्या आधारे परवानगी देण्याबाबत कळविण्यात आले आहे. आता शासकीय जमिनीमधून गॅस कंपनीच्या पाईपलाईन टाकण्यासाठी परवानगी देण्याकरीता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ३९ अन्वये शासकीय जमिनीस, विहित मुदतीसाठी जमिनीवरून पाण्याचे प्रमुख नळ, नल आणि भूमीगत वीजतारा घालण्यास, भोगवट्याने घेतलेल्या जमिनीच्या वापराकरीता जिल्हाधिकारी यांनी परवानगी देण्याची तरतूद आहे. त्याकरीता नमुना आठ मधील करारनामा संबंधित कंपनीकडून भरुन घेण्यात येतो.

३. गॅस कंपन्यांची पाईपलाईन हे वाणिज्यिक प्रयोजन आहे. भोगवट्याने घेतलेल्या जमिनीच्या, **बाजारमूल्य दर तक्त्यातील** मूल्यांकनाच्या १०% भुईभाडे अधिक भुईभाड्याच्या रकमेवर पाईपलाईन टाकण्याच्या दिनांकापासून (१ जानेवारीच्या प्राईम लेंडिंग रेटनुसार) रकमेचा भरणा करेपर्यंत व्याज आकारण्याच्या अटीवर परवानगी देण्यात यावी. पूर्वीच परवानगी दिली असल्यास थकित भुईभाडे व नियमानुसार व्याज वसूल करण्यात यावे. तसेच पाईपलाईन टाकण्यास परवानगी देताना पुढे नमूद केलेल्या अन्य अटी घालण्यात याव्यात.

अ) गॅस पाईपलाईनची सुरक्षा, देखभाल व दुरुस्ती याची जबाबदारी संबंधित कंपन्यांची राहील. आकस्मिक अपघाताच्या (गॅसगळती)/ घातपाताच्या प्रसंगी होणाऱ्या मनुष्यहानी व वित्त [illegible] भरपाईची जबाबदारीदेखील संबंधित कंपन्यांची राहील. त्या दृष्टीकोनातून सुरक्षेसंबंधी उपाययोजना करण्याबाबत संबंधित खाजगी कंपनीने हमीपत्र देणे आवश्यक आहे.

शाखा:-
आवक नं.
- 6 OCT 2008
प्र. लि. नि. लि. लि. जिल्हाधिकारी

8 OCT 2008

ब) शासकीय जमिनीमधून गॅस पाईपलाईन टाकण्यास परवानगी दिल्यानंतर सदर शासकीय जमिनीची भविष्यात आवश्यकता भासल्यास निर्वेधरित्या पूर्वीच्या स्थितीत जमीन परत करण्याची जबाबदारी संबंधित कंपन्यांची राहील.

क) शासकीय जमिनीमधून पाईपलाईन टाकताना त्यावरील झाडे, खोदकाम करताना उपलब्ध होणारी गौण खनिजे व इतर सर्व वस्तुंचा अधिकार शासनाचा राहील. त्याबाबत कंपनीला कोणताही मोबदला अथवा नुकसान भरपाई अनुज्ञेय राहणार नाही.

ड) शासकीय जमिनीमधून गॅस पाईपलाईन टाकण्याची परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्याखाली महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींचे वितरण) नियम, १९७१ मधील नियम ३९ अन्वये जिल्हाधिकारी यांना असतील. त्याकरीता सदर नियमाच्या परिशिष्ठ आठ मध्ये नमूद केलेल्या करारनाम्यानुसार नमुना सोबत जोडला आहे. असा करारनामा संबंधित कंपनीकडून भरुन घेण्यात येईल. त्यात जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अधिक अटी व शर्तीचा अंतर्भाव करता येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शिवाजी गोरे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत :
सर्व विभागीय आयुक्त.
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व उपविभागीय अधिकारी / सर्व तहसिलदार.
सर्व अधिक्षक भूमी अभिलेख.
संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय उप संचालक, नगररचना आणि इतर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (१) पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (२) नागपूर.
सर्व मंत्रालयीन विभाग
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक.
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक
अप्पर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
महसूल व वन विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव
' ज 'समुहातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग (निवडनस्ती).

H-2040-19

नमुना आठ

(नियम ३९ पहा)

करारनाम्याचा नमुना

(जमिनीखालून गॅस पाईपलाईन टाकण्यास परवानगी)

हा करारनामा, एक पक्षी महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्याचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) आणि दुसऱ्या पक्षी ------------------- जिल्ह्यातील रहीवाशी कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ अन्वये कायद्याने संस्थापित झालेली आणि --------------- येथे नोंदलेली, कार्यालय असलेली कंपनी (जसे यात यापुढे 'अनुज्ञप्तीधारक' असे संबोधण्यात आले असून उक्त शब्दप्रयोगात त्याच्या अर्थास किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर ------------------ त्याचे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक आणि अनुज्ञात अभिहस्तांकिती त्याचे उत्तराधिकारी) यांच्यामध्ये दिनांक ----------- सन २०----- रोजी करण्यात आला आहे.

ज्या अर्थी, यासोबत जोडलेला नकाशा क्रमांक --------------मध्ये रंगाने दाखविण्यात आल्याप्रमाणे ---------------------------- विभागाच्या प्रभाराखाली सरकारी रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन याखाली / त्यालगत भूमिगत गॅस पाईपलाईन घालण्याच्या परवानगीसाठी व अनुज्ञप्तीसाठी अनुज्ञप्तिधारकाने शासनाकडे अर्ज केला आहे (यात यापुढे ज्यांचा 'उक्त गॅस पाईपलाईन' असा निर्देश करण्यात आला आहे)

आणि, शासन याद्वारे पुढील अटींवर व शर्तीवर अनुज्ञप्तिधारकास अशी परवानगी व अनुज्ञप्ती मंजूर करीत आहे :-

(१) उक्त गॅस पाईप हे सरकारी रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन याच्या पातळीच्या, मोठ्या पाईपकरीता ०.९१ मीटरपेक्षा कमी नसेल इतक्या खोलीवर घालण्यात येतील; उक्त काम सुरु करण्यापूर्वी -------------------- च्या जिल्हाधिकाऱ्याशी (ज्याचा यात यापुढे 'जिल्हाधिकारी' असा निर्देश करण्यात आला आहे) विचारविनिमय केल्यानंतर निश्चित रचना ठरविण्यात येईल.

(२) जर उक्त गॅस पाईप रस्ता पार करीत असतील तर पाईप टाकण्याचे / दुरुस्त करण्याचे / अंतिमरित्या काढण्याचे काम, वाहतुकीची सोय व सुरक्षितता याबाबत योग्य ती दक्षता घेऊन, रस्त्याच्या रुंदीच्या अर्ध्या भागात करण्यता येईल. रस्त्याचा अर्धा भाग वाहतुकीसाठी खुला हाईतोंपर्यंत त्याच दुसऱ्या भागाची दुरुस्ती करण्यात येणार नाही. अपघात टाळण्याच्या दृष्टीने दिवसा योग्य असे कुंपण व रात्रीच्या वेळी कुंपण व दिव्यांची व्यवस्था करुन सर्व आवश्यक ती दक्षता घेण्यात येईल.

(३) रस्ता / जमीन / सरकारी रस्त्यालगतची जमीन याचा जो भाग उक्त गॅस पाईपलाईन टाकण्यासाठी किंवा ती काढण्यासाठी किंवा त्याची दुरुस्ती करण्यासाठी खोदण्यात आला असेल तो भाग अनुज्ञप्तिधारकाच्या खर्चाने, पूर्ववत करण्यात येईल.

(४) रस्ता / सरकारी रस्त्यालगतची जमीन याचा पृष्ठभाग उच्च प्रकारचा म्हणजेच, अस्फाल्ट डांबर, सिमेंट, कॉंक्रिट किंवा तशाच प्रकारचा असेल तर तो खोदण्याची आणि पूर्ववत करण्याचे काम, पूर्णतः अनुज्ञप्तिधारकाच्या खर्चाने सरकारकडून करण्यात येईल आणि मागणी करण्यात

(८)

आल्यावर अनुज्ञप्तिधारक उक्त खर्च तात्काळ भरील आणि जर भरण्यात आला नाही तर, तो, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अनुज्ञप्तिधारकाकडून वसूल करण्यात येईल. केलेल्या खर्चाच्या रकमेबाबतचा जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल जर जमिनीचा पृष्ठभाग उपरोक्तप्रमाणे उक्त प्रतीपेक्षा वेगळा असेल तर, जिल्हाधिकाऱ्याची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने, अनुज्ञप्तिधारकाकडून ते काम स्वखर्चाने पार पाडण्यात येईल.

(५) हा करारनामा चालू असताना, उक्त गॅस पाईपलाईन यासंबंधातची आवश्यक ती कामे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी उक्त सरकारी रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन यावर केवळ प्रवेश करण्याची अनुज्ञप्ती असेल त्याशिवाय, अनुज्ञप्तिधारकास उक्त रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन यात किंवा तीवर कोणताही अधिकार किंवा हितसंबंध असणार नाही.

(६) अनुज्ञप्तिधारकाच्या मालमत्तेचे नुकसानीपासून परिरक्षण करण्याची शासन कोणतीही हमी देणार नाही.

(७) उक्त गॅस पाईप यामधील कोणत्याही दोषामुळे किंवा त्याची दुरुस्ती न केल्यामुळे किंवा उक्त गॅस पाईप घालताना, त्याची दुरुस्ती करताना किंवा ते अंतिमरित्या काढताना त्याच्या / त्याच्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे किंवा हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीची जी कोणतीही हानी होईल किंवा तिला जो कोणताही अपाय होईल त्याबद्दल, अनुज्ञप्तिधारक हा, एकमेव जबाबदार राहील आणि अनुज्ञप्तिधारक हा याबाबतीत शासनविरुद्ध करण्यात येतील असे सर्व दावे, मागण्या, शासनावर पडतील अशी दायित्वे व अशा दाव्यामुळे जो कोणताही शासनास खर्च करावा लागेल त्याबद्दल शासनाची क्षतिपूर्ती करील व त्यामुळे शासनाची अशी क्षतिपूर्ती करण्यात येईल.

(८) अनुज्ञप्तिधारक, स्वतःच्या खर्चाने, उक्त गॅस पाईप योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवील आणि सरकारी रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन यांच्या पृष्ठभागाची किंवा इतर सरकारी मालमत्तेची, गॅस गळतीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, जी कोणतीही हानी होईल तिची, जिल्हाधिकाऱ्याची किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीची संपूर्ण खात्री होईल अशा रीतीने तात्काळ भरपाई करील.

(९) ज्यामुळे उक्त गॅस पाईप हटविणे आणि परत टाकणे आवश्यक होईल असे रस्त्यात किंवा इतर जमिनीत कोणतेही फेरबदल करणे आवश्यक असल्याचे आढळून येईल त्याबाबतीत, अशा रीतीने पाईप हलविण्याचा व ते परत टाकण्याचा खर्च अनुज्ञप्तिधारकाकडून करण्यात येईल.

(१०) या करारनाम्याच्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात अनुज्ञप्तिधारकाने कसुरी केल्यास, जिल्हाधिकाऱ्यास हा करारनामा रद्द करण्याचे आणि आवश्यक असेल तर, तीन महिन्याच्या नोटिशीची मुदत संपल्यानंतर उक्त गॅस पाईप काढून टाकण्याचे स्वातंत्र्य असेल आणि जिल्हाधिकाऱ्याने अशा रीतीने केलेल्या अशा खर्चाबद्दल अनुज्ञप्तिधारकास जबाबदार धरले जाईल.

(११) शासनास, सर्व वेळी तशा अर्थाची तीन महिने मुदतीची नोटीस देऊन हा करारनामा समाप्त करण्याचे स्वातंत्र्य असेल व अशा बाबतीत अनुज्ञप्तिधारकास, हा करारनामा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(१२) अनुज्ञप्तिधारक जिल्हाधिकाऱ्याची लेखी पूर्व परवानगी घेतल्याखेरीज उक्त गॅस पाईप टाकण्यास त्याच्याशी संबंधित अशी इतर कोणतीही कामे करण्यास प्रारंभ करणार नाही.

(१३) अनुज्ञप्तिधारक, जेव्हा जेव्हा गॅस पाईप रस्ता / रस्त्याखालची जमीन / जमीन याखालून प्रथम टाकण्यात येतील तेव्हा सरकारी रस्ता / रस्त्याखालची जमीन / जमीन याच्या उघडण्यासाठी १००० रु. फी शासनास देईल आणि वापरासाठी प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिलला किंवा त्या सुमारास * -------------- रु. प्रतिवर्षी आगाऊ भाडेही देईल.

(१४) अनुज्ञप्तिधारक, उक्त गॅस पाईप घालण्याच्या कामास प्रारंभ करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याकडे (----------------------------) रुपये ठेव म्हणून ठेवील व उक्त रक्कम, जिल्हाधिकाऱ्याच्या मते वरील पैकी कोणत्याही शर्तीचे, त्याची किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याच्या प्रतिनिधीची खात्री होईल अशा रीतीने, पालन करण्यात आले नसेल तर, संपूर्णतः किंवा अंशतः सरकार जमा होईल.

(१५) या करारनाम्याद्वारे अनुज्ञप्तिधारकाने द्यावयाच्या रकमेचा कोणताही भाग द्यावयाचा राहिला असेल तर आणि तेव्हा, शासनास याबाबत करता येतील अशा इतर कोणत्याही उपाययोजनांस बाधा न आणता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधानुसार उक्त रक्कम किंवा तिचा भाग, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अनुज्ञप्तिधारकाकडून वसूल करता येईल.

(१६) अनुज्ञप्तिधारक, हा करारनामा तयार करण्याचा, तो मुद्रांकित करुन देण्याचा व त्याच्या निष्पादनाचा सर्व खर्च सोशील.

(१७) या करारनाम्यासंबंधी अनुज्ञप्तिधारक व जिल्हाधिकारी यांच्यामध्ये कोणताही मतभेद आल्यास ती बाब, आयुक्त यांचेकडे पाठविण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतिम आणि अनुज्ञप्तिधारकास बंधनकारक असेल.

(१८) अनुज्ञप्तिधारकास द्यावयाची किंवा त्यावर बजावावयाची कोणतीही नोटीस किंवा इतर लेख, शासनाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडून देता किंवा बजावता येईल व अशी कोणतीही नोटीस किंवा कोणताही लेख हा, जर तो अनुज्ञप्तिधारकाच्या शेवटी माहिती असलेल्या पत्त्यावर / कंपनीच्या नोंदणी केलेल्या कार्यालयात देण्यात आला तर किंवा नोंदणीकृत डाकेने त्याच्या पत्त्यावर / कंपनीच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आला तर, रीतसर अनुज्ञप्तिधारकास देण्यात आल्याचे किंवा त्याच्यावर बजाविण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(१९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेल्या नियमांस अधीन ठेवून ही अनुज्ञप्ती देण्यात येत आहे.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकरीता व त्यांच्या वतीने, जिल्हाधिकाऱ्याने सही करुन आपल्याला कार्यालयाचा शिक्का वठविला आहे व------------------ # अनुज्ञप्तिधारकाने आपले सही केली आहे

(१) -------------------- व

(२)-------------------- यांनी, + वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी दिनांक ---------------- च्या मंडळाच्या ठरावानुसार कंपनीकरिता व कंपनीच्या वतीने, अनुक्रमे अपल्या सह्या करुन कंपनीचा शिक्का लावला आहे.

| कार्यालयीन मुद्रा |
|---|

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने --------------------- च्या जिल्हाधिकाऱ्याने, खालील व्यक्तीच्य समक्ष सही व शिक्का करुन स्वाधीन केला.

१. ----------------------------------------

२. ----------------------------------------

कंपनीची मुद्रा

संचालक

यांनी कंपनीच्या वतीने सही

शिक्क्यानिशी स्वाधीन केले आणि खालील व्यक्तींच्या समक्ष कंपनीचा सामाईक शिक्का वठविण्यात आला आहे.

१. ------------------------------

कार्यालयीन मुद्रा

२. ------------------------------

यांच्या समक्ष वर नमूद केलेल्या व्यक्तीने सही करुन स्वाधीन केला.

*****

* जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल.

\# अनुज्ञप्तिधारक व्यक्ती असेल तर उपयोग करावयाचा.

\+ अनुज्ञप्तिधारक कंपनी असेल तरच उपयोग करावयाचा.

---o---

H-2040-3